MAHARASHTRA TOURISM

## महाराष्ट्र

# एक अनोखं जग

पर्यटन संचालनालय, पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन

एप्रिल २०२६ / अंक ४



आरे वारे समुद्रकिनारा



काळू धबधबा




चिखलदरा

## महाराष्ट्रातील विशेष उपक्रमांचा आढावा

महाराष्ट्र पर्यटन क्षेत्राच्या दृष्टीने एप्रिल 2026 महिना महत्त्वपूर्ण ठरला. उन्हाळ्याच्या सुट्ट्या आणि राज्यभरातील विविध सांस्कृतिक महोत्सवांमुळे राज्यभरातील पर्यटन स्थळांवर पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली. यामुळे महाराष्ट्रातील विविध पर्यटन स्थळांचे आकर्षण आणि महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्किटला राज्यभरातून प्रतिसाद, पर्यटन विभागाचा कौतुकास्पद उपक्रम




महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि. 13 व 14 एप्रिल 2026 रोजी आयोजित करण्यात आलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीट सहलीचा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. सदर टूर सर्कीट सहल मुंबई, नागपूर, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सोमवारी, 13 एप्रिल 2026 रोजी सदर टूर सर्किटचा शुभारंभ कार्यक्रम पार पडला. सदर टूर सर्किटदरम्यान पर्यटन विभागाचे उपसचिव संतोष रोकडे, महाराष्ट्र पर्यटनाच्या युवा दूत नवेली देशमुख उपस्थित होत्या. मान्यवरांनी हिरवा झेंडा दाखवून टूर सर्किट उपक्रमाची सुरुवात केली.

मुंबई, नाशिक आणि नागपूर येथे भेट देणारे पर्यटक तसेच अनुयायींसाठी सदर टूर सर्किट निःशुल्क होती. दोन दिवसीय टूर सर्किटमध्ये प्रत्येक वयोगटातील पर्यटक, नागरिकांनी सहभाग घेतला होता.

## कोयना दौलत डोंगरी महोत्सव 2026'चा राज्यभरात डंका, 2 लाखांहून अधिक पर्यटकांची उपस्थिती

'कोयना दौलत डोंगरी महोत्सव 2026' चा समारोप सोहळा 9 एप्रिल 2026 रोजी उत्साहात पार पडला. 2 एप्रिल 2026 पासून सुरू झालेल्या या महोत्सवाला 2 लाखांहून अधिक पर्यटकांनी भेट दिली असून, यामुळे ग्रामीण पर्यटनाला एक वेगळी ओळख मिळाली आहे. महोत्सवाला मिळालेला प्रतिसाद पाहता 6 एप्रिल 2026 रोजी माननीय उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी महोत्सवात 3 दिवसांची वाढ घोषित केली होती. दरम्यान पर्यटकांनी महोत्सवाचा मनसोक्त आनंद लुटला.




'कोयना दौलत डोंगरी महोत्सव 2026' ला मिळालेले यश पाहून येणाऱ्या हिवाळ्यात 'कोयना बॅकवॉटर महोत्सव' जागतिक स्तरावर आयोजित करणार असल्याचीही घोषणा उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केली. माननीय पर्यटन मंत्री श्री. शंभूराज देसाई यांनी महोत्सवाला मिळालेल्या भरघोस यशाबद्दल आयोजक आणि शासकीय अधिकाऱ्यांचे आभार मानले.
या महोत्सवाप्रसंगी पर्यटन संचालनालयाचे संचालक डॉ. बी. एन. पाटील (भा.प्र.से), श्री. निलेश गटणे (भा.प्र.से), व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मोरना शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. रविराज देसाई, लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष श्री. यशराज देसाई यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## ‘खगोल दर्शन महोत्सव 2026’ कार्यक्रम उत्साहात संपन्न

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त, आंतरराष्ट्रीय डार्क स्काय सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर, दिनांक 24 ते 26 एप्रिल 2026 दरम्यान एमटीडीसी लोणार, जि. बुलढाणा व रायगड जिल्ह्यातील हरिहरेश्वर येथे पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने ‘खगोल दर्शन महोत्सव 2026’ चे आयोजन करण्यात आले होते.

मा. मंत्री, पर्यटन, श्री. शंभूराज देसाई व मा. राज्यमंत्री, पर्यटन, श्री. इंद्रनील नाईक यांच्या नेतृत्वाखाली, तसेच पर्यटन विभागाचे प्रधान सचिव मा. श्री. संजय खंदारे (भाप्रसे) व व्यवस्थापकीय संचालक, मपविम श्री. निलेश र. गटणे (भाप्रसे) यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या महोत्सवाप्रसंगी श्री. चंद्रशेखर जयस्वाल, महाव्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, श्री. संतोष रोकडे, उप सचिव, पर्यटन विभाग आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर महोत्सवामध्ये स्टारगेझिंग (आकाश निरीक्षण), तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि विज्ञानाधारित विविध उपक्रमांचा समावेश होता. त्याचबरोबर नागरिकांना आकाश निरीक्षणाचा एक अनोखा व संस्मरणीय अनुभव घेण्याची संधी मिळाली.

- ## आगामी कार्यक्रम

## कुणकेश्वर येथे रंगणार ‘आंबा महोत्सव 2026’

कोकण विभागातील पर्यटनाला चालना देणे तसेच स्थानिक पर्यटन आणि सांस्कृतिक वारशाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने राज्याच्या पर्यटन विभागाद्वारे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सुवर्ण वर्ष निमित्त ‘आंबा महोत्सव 2026’चे आयोजन करण्यात आले आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील कुणकेश्वर येथे दि. 15 ते 18 मे 2026 या कालावधीत हा महोत्सव आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती पर्यटनमंत्री श्री.शंभूराज देसाई यांनी दिली. तसेच पर्यटक आणि कोकणप्रेमींनी मोठ्या संख्येने या महोत्सवात सहभागी होऊन कोकणच्या संस्कृतीचा आणि आंब्यांचा आस्वाद घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले.

शेतकऱ्यांकडून थेट ग्राहकांपर्यंत आंब्यांची विक्री होणार असून, कोकणातील वैशिष्ट्यपूर्ण स्थानिक उत्पादनेही विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. तसेच आंबा उत्पादक शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांविषयी माहिती देण्यासाठी मार्गदर्शन शिबिरांचे आयोजनही करण्यात येणार आहे.



## • महत्त्वाच्या बातम्या

## कोयना बॅकवॉटर महोत्सव 2026 : महाबळेश्वर-तापोळा येथे भव्य आयोजनासाठी नियोजन सुरू

कोयना जलाशयाचा विस्तीर्ण परिसर व निसर्गसौंदर्य जागतिक स्तरावर पोहोचवून महाबळेश्वर पर्यटनस्थळाची आंतरराष्ट्रीय ओळख दृढ करण्याच्या उद्देशाने '**कोयना बॅकवॉटर महोत्सव 2026**' भव्य स्वरूपात आयोजित करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथिगृह येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार या महोत्सवाचे सर्वंकष नियोजन करण्यात येणार असून, राज्य व स्थानिक प्रशासनाने महोत्सवाच्या अंतिम आराखड्याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करावा, असे निर्देश मंत्री देसाई यांनी यावेळी दिले.



बैठकीस पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, पर्यटन संचालनालयाचे संचालक डॉ. बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, पर्यटन विभागाचे उपसचिव संतोष रोकडे, उपसचिव विजय पोवार, महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, पर्यटन संचालनालयाचे सहसंचालक संतोष जाधव, सहाय्यक संचालक सुशील पवार व अन्य अधिकारी उपस्थित होते.


## "महाराष्ट्राच्या पर्यटनाला जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी बहुभाषिक आणि बहुआयामी प्रचारावर भर देणार" - पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

महाराष्ट्राच्या समृद्ध पर्यटन वारशाला देश-विदेशात व्यापक ओळख मिळवून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून, त्यासाठी आधुनिक, बहुभाषिक आणि प्रभावी प्रसार-प्रचार धोरण राबविण्यात येणार असल्याचे प्रतिपादन पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले. सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित मिडिया प्लॅन 2026 आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत पर्यटन विभागाच्या ब्रँडिंग व प्रसार-प्रसारासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

सदर बैठकीस पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, पर्यटन संचालनालयाचे संचालक डॉ. बी.एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, पर्यटन विभागाचे उपसचिव संतोष रोकडे, उपसचिव विजय पोवार, महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, पर्यटन संचालनालयाचे सहसंचालक संतोष जाधव, सहाय्यक संचालक सुशील पवार व अन्य अधिकारी उपस्थित होते.

## कोकण विभागात पर्यटन विकास महामंडळाची दमदार कामगिरी; उत्पन्नात विक्रमी वाढ

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असलेल्या महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (मपविम) कोकण विभागाने पर्यटन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत उत्पन्नात विक्रमी वाढ नोंदवली आहे. गणपतीपुळे येथील पर्यटक निवासाने 10 कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल नोंदवली असून तारकर्ली येथून 3.20 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. मर्यादित खोल्यांच्या उपलब्धतेतही मिळालेले हे उत्पन्न विभागाचे व्यवस्थापन उत्कृष्ट असल्याचे पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.



सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित पर्यटन विभागाच्या बैठकीत पर्यटन मंत्री शंभूराज देसाई बोलत होते. यावेळी पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, संचालक डॉ. बी. एन. पाटील, मपविमचे व्यवस्थापकीय संचालक निलेश र. गटणे, उपसचिव, पर्यटन, संतोष रोकडे, उपसचिव, पर्यटन, विजय पोवार, महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल तसेच सहसंचालक संतोष जाधव उपस्थित होते.

## कोकणात आई पर्यटन धोरणाची यशस्वी घोडदौड



महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या आई या महिला केंद्रित पर्यटन धोरणाची कोकणातील पाचही जिल्ह्यांत प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. या योजनेअंतर्गत कोकणातील 67 महिला पर्यटन व्यावसायिकांच्या 343 प्रस्तावांना मंजुरी देऊन त्यांना एकूण 14 लाख 92 हजार 697 रुपयांचा प्रत्यक्ष व्याज परतावा देण्यात आला आहे.

महिलांमध्ये उद्योजकता आणि नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी हे धोरण आखण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत पर्यटन व्यवसाय करू इच्छिणाऱ्या महिला राष्ट्रीयीकृत बँकेकडून कर्ज घेऊ शकतात. या कर्जाच्या व्याजापोटी 4 लाख 50 हजार रुपयांपर्यंतचा परतावा राज्य शासनाकडून केला जातो. कोकणात योजना सुरू झाल्यापासून महिलांचा याला मोठा प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत 814 महिलांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे. त्यापैकी 602 महिलांच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे.

# महाराष्ट्रातील प्रसिद्ध उन्हाळी पर्यटन स्थळे

## पवना तलाव



सह्याद्री पर्वतरांगांच्या कुशीत वसलेले पवना तलाव म्हणजे निसर्गप्रेमींसाठी मोठी पर्वणीच आहे. मुंबई व पुण्यापासून जवळच असलेले हे ठिकाण कॅम्पिंगसाठी प्रसिद्ध आहे. रात्री तलावाच्या काठी तंबू ठोकून, थंडगार हवेत मोकळा श्वास घेत स्वच्छ आकाशातील चांदण्या न्याहाळत बसण्याची मज्जा काही औरच आहे. नेहमीच्या धावपळीपासून दूर शांत ठिकाणी तुम्हाला निवांत क्षण अनुभवायचे असतील तर पवना तलाव उत्तम पर्याय आहे. दिवस शेवटाकडे असताना चांदण्या रात्री वातावरणातील गारवा आणि थंड वाऱ्याची हळूवार झुळूक मनाला स्पर्श करून जाते. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये तुम्ही पवना तलावाच्या शेजारी निसर्गाच्या सानिध्यात तंबू ठोकून राहू शकता. मुंबईपासून जवळपास 3 ते 4 तास तर पुण्यापासून दीड ते 2 तासांमध्ये तुम्ही पवना तलाव येथे पोहोचू शकता.

## आरे वारे समुद्रकिनारा

महाराष्ट्रातील आरे वारे समुद्रकिनारा कोकण किनारपट्टीला लाभलेली अमुल्य नैसर्गिक देणगी आहे. दोन जुळे किनारे एकत्र येऊन तयार झालेल्या या समुद्रकिनाऱ्याचे सौंदर्य स्वच्छ निळेभोर पाणी आणि मऊ वाळू यामुळे आणखीनच खुलून दिसते. वळणावळणाच्या सागरी मार्गावरून प्रवास करताना अरबी समुद्राचे विहंगमय दृश्य येथे अनुभवायला मिळते. आरे वारे समुद्रकिनाऱ्यालगत तुम्ही निवांत फेरफटका मारू शकता. येथे सुर्यास्ताचे दृश्य अनुभवणे, समुद्री कासवांचे दर्शन घडणे पर्यटकांसाठी पर्वणीच आहे. पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणात असल्यामुळे या समुद्रकिनारी पोहणे शक्य नसले तरी साहसी पर्यटनाचा भाग म्हणून तुम्हाला येथे झिपलाईनचा आनंद घेता येतो. आरे वारे समुद्रकिनाऱ्याजवळच असलेले प्रसिद्ध गणपतीपुळे मंदिर, रत्नदुर्ग किल्ल्यालाही तुम्ही भेट देऊ शकता.



## राजमाची किल्ला



लोणावळ्याजवळ असलेला राजमाची किल्ला प्रसिद्ध गिरिदुर्गांपैकी एक आहे. श्रीवर्धन आणि मनरंजन हे दोन बालेकिल्ले या किल्ल्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणारा हा किल्ला जुन्या गुहा, छोटे-मोठे धबधबे आणि हिरव्यागार निसर्गसौंदर्याने पर्यटकांना आणखीनच आकर्षित करतो. घनदाट जंगलामधून पायवाट काढत किल्ल्यापर्यंत पोहोचणे म्हणजे गिर्यारोहकांसाठी तारेवरची कसरत असते. मात्र हा प्रवास आयुष्यभराचा आनंद देऊन जातो. किल्ल्याच्या आजूबाजूच्या परिसरात तुम्ही कॅम्पिंगही करू शकता. तंबू ठोकून ऐतिहासिक वास्तुच्या सहवासात वावरताना तुम्हाला निसर्गसौंदर्य जवळून अनुभवायला मिळते. राजमाची किल्ला मुंबईपासून 90 ते 100 किमी आणि पुण्यापासून 80 ते 85 किमी लांब आहे. एक ते दोन दिवसांच्या सहलीचे तुम्ही नियोजन करत असाल तर राजमाची किल्ला उत्तम पर्याय आहे.


MAHARASHTRA TOURISM
MAHARASHTRA
www.maharashtratourism.gov.in | www.mahaatithi.org
Follow us on:
MaharashtraTourism
diot@maharashtratourism.gov.in
@maha_tourism
maharashtratourismofficial